**जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचे कार्यालय** **(नैसर्गिक आपत्ती शाखा),पत्ता-विजयनगर, सांगली**

फोन नं. 0233/2600363 ई-मेल sanglirdc@gmail.com

वाचले:-
१. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005
३. महाराष्ट्र शासन क्र कोरोना 2020 प्र क्र. 58/आरोग्य 6 दि 14 मार्च 2020
४. महसुल व वन विभाग,यांचेकडील शासन निर्णय क्र.सीएसलएस 2020/प्र.क्र.123/म-3 दि.16/03/2020
५. महसुल व वन विभाग,यांचेकडील शासन निर्णय क्र.सीएसलएस 2020/प्र.क्र.123/म-3 दि.28/03/2020
६. क्र ससंले/कावि/2245 0244/अनुदान वितरण/236/2020 दिनांक 16/03/2020
७. क्र.ससंले/कावि/22450244/अनुदान वितरण/253/2020 दिनांक 23/03/2020
८. क्र.ससंले/कावि/2245 0244/2020-21/ 289/2020 दिनांक 04/04/2020
९ क्र.ससंता/नैआ/कोरोना/22450244/2020-21/58/2020 दिनांक 24/04/2020

---

क्र.गृह-1/कार्या-6/नै.आ/आरआर/१४७०/2020 दि.26/05/2020

COVID -19 विषाणूचा प्रादुर्भाव झाल्यामुळे रोगराई नियंत्रीत करण्याची आवश्यकता विचारात घेवून उपाययोजना करण्यासाठी उपरोक्त संदर्भीय वाचले क्र २ ते ५ अन्वये सांगली जिल्हयासाठी एकूण र २,६५,००,०००/-(र रु दोन कोटी पासष्ट हजार फक्त ) इतका निधी मंजूर झालेला आहे.

आयुक्त, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका, यांनी त्यांचेकडील दि १५/०५/२०२० रोजीचे पत्रानुसार साहित्य, औषधे खरेदी करण्यासाठी र रु ३७,८७,६४९/- मागणी केले होते. मा जिल्हाधिकारीसो सांगली यांनी दि १५/०५/२०२० रोजीच्या टिपणीनुसार आयुक्त, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांना खालीलप्रमाणे साहित्य, औषधे खरेदी करण्यासाठी खरेदी करण्यासाठी र रु २९,८९,२२४/- (र रु एकोणतीस लाख एकोण्णवद हजार दोनशे चोवीस मात्र )मंजूर केले आहेत. र रु २९,८९,२२४/- चा धनादेश सोबत जोडणेत आला आहे.

| अ क्र | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| 1 | पल्स ऑक्सिमीटर ७० नग | २६६००० |
| 2 | N-९५ मास्क NIOSHI मार्किंग १५०० नग | २४९००० |
| 3 | इन्फ्रारेड थर्मामीटर ५ नगर व सोडीयम हायपोक्लाराईड १०० लि | ९८७०० |
| 4 | रबरी हॅण्ड ग्लोज २००० नग | १३०००० |
| 5 | मॅलेथॉन ५० % EC १६०० लिटर | ११८४००० |
| 6 | मोनोक्लोरो फिनाइल लिक्विड ५५० लिटर | २४४०२४ |
| 7 | सोडीयम हायपोक्लाराईड १००० लि. वायरेक्स II २५६ १५० लिटर | २५२५०० |
| 8 | डिस्पोझिबल ग्लोज ३०००० नग | १३५००० |
| 9 | मनपा सफाई कर्मचारी यांचेसाठी रबरी हॅण्ड ग्लोज | १३०००० |
| 10 | क्वॅारंटाइन वॅार्डातील रुग्णांना जेवण व दैनंदिन जीवनावश्यक वस्तू पुरवठा ( अंदाजीत रक्कम) | ३००००० |
| **एकूण (र रु एकोणतीस लाख एकोण्णवद हजार दोनशे चोवीस मात्र)** | | **२९,८९,२२४/-** |

सदर निधी खालील अटी व शर्ती नुसार खर्च करणेत यावा.

1. उपरोक्त निधी खर्च करताना महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र महसुल व वन विभाग,यांचेकडील शासन निर्णय क्र.सीएसलएस 2020/प्र.क्र.123/म-3 दि.16/03/2020 आणि केंद्रशासन गृहमंत्रालय यांचे पत्र क्र 33 -4/2020- एनडीएम-१ दि 14/03/2020 यामधील तरतूदीनुसार सर्व अटी व शर्तीची पूर्तता पूर्ण करुन खर्च करण्यात यावा.
2. वितरित केलेल्या निधीतून खर्च करताना वित्तीय नियमांचे आणि शासनाच्या विविध नियमातंर्गत नेमून दिलेल्या कार्यपध्दतीचे पालन करण्यात यावे. तसेच सदर निधी खर्च करताना, आयुक्त सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका हे लेखा आक्षेप, लोक लेखा समिती, विधीमंडळ कामकाज इ. बाबीसाठी संबंधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभागास जबाबदार राहतील.

3. वितरीत करणेत आलेल्या निधीस प्रशासकीय मंजूरी घेणेची व खर्च करणेसाठी विहील कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करणेची सर्वस्वी जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राहील.

4. प्रस्तावित उपकरणे,औषधे खरेदीस तांत्रिक मंजुरी देण्यास सक्षम असलेल्या प्राधिका-याने दराबाबत ते वस्तुनिष्ठ आहेत इ.ची खात्री करुन घ्यावी.

5. मंजूर करणेत आलेल्या निधीच्या मर्यादेतच निधी खर्च करणेची दक्षता घ्यावी.

6. वितरीत केलेला निधी खर्च झालेनंतर विहीत नमुनेमधील उपयोगिता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करणेत यावे. उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झालेशिवाय पुढील निधी वितरीत करणेत येणार नाही.

Mosami 23/5/2020

(मौसमी चौगुले-बर्डे)

निवासी उपजिल्हाधिकारी सांगली

प्रति

आयुक्त, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांना पुढील जरुर त्या कार्यवाहीसाठी

प्रत- 1) तहसिलदार ( सर्वसाधारण ) लेखा शाखा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांना आवश्यक कार्यवाहीसाठी

2) मा. विभागीय आयुक्त,पुणे (महसूल/ताळमेळशाखा) विधानभवन पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.